# ( प्रेसनोट )

## मुद्रांक विभागाचे सह.जिल्हा निबंधक वर्ग–०१ यांना ला. प्र. वि. अकोला पथकाने १०,०००/– रू. ची लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडले...

लचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला येथे तक्रारदार यांनी समक्ष येवुन तक्रार नोंद केली की, तक्रारदार हे एमआयडीसी. अकोला येथे व्यापार करीत असुन त्यांनी व त्याचे व्यापारातील भागीदार यांनी एमआयडीसी अकोला येथे प्लॉट क्रं. एन/२५७ ही जागा २०२३ मध्ये भाडेत्ववावर घेतली होती. नमुद प्लॉट तक्रारदार यास भाडेत्ववावर त्यांचे पत्नीचे नावे करणे असल्याने नमुद जागेवर आजपावेतो भाडेपट्टा करीता लागणारा थकबाकी मुंद्राक शुल्क भरणे आवश्यक असल्याने तक्रारदार याचे भागीदार यांनी नोंदणी व मुद्रांक विभाग, अकोला येथे भाडेपट्टा करीता लागणारे मुद्रांक शुल्क काढुन देण्याकरीता अर्ज सादर केला होता. नमुद प्लॉटवरील मुद्रांक शुल्क २,६७,२७०/–रू वरून ९७,३१०/–रू असे कमी दिली म्हणून आणि दस्त क्रमांक ३०९१ लवकरात लवकर प्रमाणीत करून देण्याकरीता श्री. किरण चौधरी, सह. जिल्हा निबंधक, वर्ग–०१, अकोला यांनी तक्रारदार याचेकडे १०,०००/– रू. लाचेची मागणी केल्याची तक्रार यातील तक्रारदार यांनी ला. प्र. वि. अकोला कार्यालय येथे केली होती.

सदर तक्रारची अनुषंगाने सापळा अधिकारी यांनी लाचेची मागणीबाबत दिनांक २४/०६/२०२६ रोजी पडताळणी कारवाई केली असता, आरोपी लोकसेवक श्री. किरण चौधरी, सह. जिल्हा निबंधक, वर्ग–०१, अकोला यांनी तक्रारदार याचे एमआयडीसी. अकोला येथील भाडेपट्टाचा प्लॉट क्रं. एन/२५७ चे नमुद प्लॉटवरील मुद्रांक शुल्क २,६७,२७०/–रू वरून ९७,३१०/–रू असे कमी करून दिली व दस्त क्रमांक ३०९१ लवकरात लवकर प्रमाणीत करून देण्याकरीता १०,०००/–रू. लाच मागणी करून स्वतः स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने आज दिनांक २५/०६/२०२६ रोजी सापळा कार्यवाही वेळी आरोपी लोकसेवक श्री. किरण चौधरी, सह. जिल्हा निबंधक, वर्ग–०१, अकोला यांनी सह. जिल्हा निबंधक कार्यालय येथील दालनात तक्रारदार यांचे कडील १००००/– रू. ची लाच स्वतः स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले. आरोपी लोकसेवक श्री. किरण चौधरी, सह. जिल्हा निबंधक, वर्ग–०१, अकोला यांचे विरूध्द पोलीस स्टेशन सिटीकोतवाली, अकोला येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. बापू बांगर, पोलीस अधिक्षक, अमरावती परिक्षेत्र, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती, तसेच मा. श्री. सचिद्र शिंदे अपर पोलीस अधिक्षक, अमरावती परिक्षेत्र, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधिक्षक श्री.मिलींदकुमार अ. बहाकर, पोलीस निरिक्षक श्री. प्रविण वेरूळकर, पोलीस निरिक्षक श्री. अतुल इंगोले, पोहेकॉ. डिंगाबर जाधव, अमोल भांड, अविनाश पाचपोर, पोकॉ. संदीप टाले, असलम शेख, गोपाल किरडे आणि चालक पोहेकॉ. सलीम खान पोकॉ. नफीज शेख यांनी केलेली आहे.

बुलडाणा, अकोला, वाशिम, अमरावती व यवतमाळ या जिल्हातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम (एजंन्ट) यांनी कोणतेही शायकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर शासकीय शुल्का व्यतिरिक्त लाचेची मागणी केली असल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला येथे संपर्क साधावा. तक्रारदाराचा तक्रारीवर तापडीने कारवाई करण्यात येईल व तक्रारदार यांचे सापळा कार्यवाहीत वापरण्यात आलेली रक्कम एका महीण्यात परत केली जाईल. तसेच तक्रारदार याचे शायकीय विभागातील पेन्डीग वैध कामही पुर्ण करून दिले जाईल.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा

ऑफिस फोन नं.:– ०७२४–२४१५३७०,

टोल फ्रि. क्रमाक :– १०६४

मोबाईल क्रमाक :– ९८०३८०१०६४

(मिलींदकुमार अ. बहाकर)
पोलीस उपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला